MAHARASHTRA STATE AIDS CONTROL SOCIETY
MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
www.mahasacs.org
एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!

एड्समुक्त महाराष्ट्र एकच **निर्धार**
खाजगी वितरणासाठी
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा समाचार

## मनोगत



राज्यातील एचआयव्ही/एड्सच्या नियंत्रणासाठी 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे'द्वारे अनेकानेक वैविध्यपूर्ण कार्यक्रम व योजना सातत्याने आखल्या जात आहेत. त्या सर्वांचा गोषवारा सर्व थरांतील लोकांपर्यंत पोहोचावा व त्यांना संस्थेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सोयींचा अधिकाधिक लाभ घेता यावा यास्तव '**निर्धार**' हे मुखपत्र मार्च २००९पासून सुरू करण्यात आले आहे. 'निर्धार'च्या पहिल्याच अंकाचे वाचकांनी मनापासून स्वागत केले व संस्थेच्या कार्यकर्त्यांचा उत्साह वृद्धिंगत केला त्याबद्दल सर्वप्रथम वाचकांचे शतशः आभार.

एचआयव्ही/एड्सशी मुकाबला करायचा असेल तर त्याबाबत जगजागृती होणे ही पहिली व अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. त्यासाठी व्यक्तिस एचआयव्हीचा संसर्ग होऊ नये म्हणून कोणती खबरदारी घेतली जावी, संसर्गित व्यक्तिने कोणती खबरदारी घ्यावी या संदर्भातील समुपदेशन हा संस्थेचा एक पायाभूत उपक्रम आहे. याशिवाय पोलीस, महाविद्यालयीन विद्यार्थी, शासकीय विभाग अशा समाजातील प्रमुख घटकांना प्रशिक्षित करून त्यांद्वारे समाजातील इतर घटकांमध्ये याबाबत जागृती घडवून आणणे यासारखे इतरही अनेक उपक्रम संस्थेद्वारे राबविले जात आहेत. त्यासंदर्भातील माहिती 'निर्धार'च्या या अंकामध्ये वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. जागतिक महिलादिन नुकताच साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने स्त्रियांचे आरोग्य व एचआयव्ही/एड्स या संदर्भातील 'युनायटेड नेशन्स'द्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्वेक्षणांबाबत हाती आलेली माहितीही या अंकात वाचकांसमोर मांडण्यात आली आहे. संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांची वाचकांना दृष्य माहिती उपलब्ध व्हावी म्हणून एका फोटोफीचरचाही अंतर्भाव या अंकात करण्यात आला आहे. या सर्वांमधून वाचकांच्या उत्साहवर्धक प्रतिक्रिया व मार्गदर्शक सूचना उत्स्फूर्तपणे प्राप्त होतील ही आशा.

**-रमेश देवकर**
प्रकल्प संचालक
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई.

### संपादकीय मंडळ

संपादक
माहिती, शिक्षण व संवाद विभाग
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई.

### अनुक्रमणिका


- यात्रोत्सवातून जनजागृती....... १
- संस्थेतर्फे राबविण्यात येणारे विविध जनजागृती उपक्रम...... २
- स्त्रियांचे आरोग्य व एड्स........ ३
- फोटोफीचर ४


## यात्रोत्सवातून जनजागृती



विविध, उत्सव, यात्रा हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात तेथील परंपरेनुसार विविध यात्रा भरत असतात व त्यावेळी आसपासच्या परिसरातील असंख्य भाविक तेथे दर्शनास येतात. अशा या पारंपरिक यात्रांचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य एड्स संस्थेतर्फे या यात्रेचे काळात एचआयव्ही/एड्स जनजागृती अभियाने राबविली जातात.

या अनुषंगाने गेल्या वर्षभरात पंढरपूरमधील सुप्रसिद्ध आषाढी एकादशी यात्रा, सांगली जिल्ह्यातील जत येथील 'यलम्मादेवी यात्रा,' लोकप्रिय सारंगखेडा यात्रा, नांदेडमधील 'दत्त यात्रा', सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भराडी देवीची 'आंगणेवाडी यात्रा, बारामती येथील 'भीमथडी यात्रा' अशा निरनिराळ्या यात्रोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी जनजागृतीपर स्टॉल, एचआयव्ही/एड्स विषयी माहितीपर साहित्यांचे वाटप, महत्वाच्या ठिकाणी पथनाट्य सादरीकरण, आरोग्य चर्चासत्राचे आयोजन, समुपदेशन सुविधा, बॅनर्स, पोस्टर्स, प्रदर्शनी चर्चासत्र, व्याख्यानमाला इ. कार्यक्रमांचे आयोजन करून हजारो भाविकांपर्यंत एचआयव्ही/एड्सविषयीच्या शास्त्रीय माहितीचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

दि. १८ ते २० फेब्रुवारी ०९ या दरम्यान आंगणेवाडी येथे श्रीदेवी भराडी जत्रोत्सवानिमित्त एचआयव्ही/एड्स माहिती मार्गदर्शन व प्रदर्शन लावण्यात आले. प्रदर्शनामध्ये प्रामुख्याने पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके यांद्वारे जनजागृती करण्यात आली. एचआयव्ही/एड्सची माहिती देणाऱ्या हस्तपत्रिका, घोषवाक्य असलेली कॅलेंडर्स, विविध प्रकारची माहिती पत्रके भाविकांना वाटण्यात आली. सदर प्रदर्शनाचा व माहितीपत्रकांचा लाखो भाविकांनी लाभ घेतला. लातूर येथे दि. २३ फेब्रुवारी ते ८ मार्च ०९ या काळात झालेल्या श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या महाशिवरात्री यात्रोत्सवाच्या निमित्ताने एड्स विषयावर निबंध, चित्रकला स्पर्धा, नाट्यस्पर्धा, भाषणे, गायन व पथनाट्य स्पर्धा, कलापथकाच्या माध्यमातून पोवाडे व लोकगीते यांचे सादरीकरण, वृत्तपत्रातून जाहिराती व बातम्यांद्वारे प्रसिद्धी देऊन व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यात आली.

**-अश्विनी निकम**
**सहाय्यक संचालक (मा.शि.सं)**

# निर्धार

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा समाचार

## प्रशिक्षकांचे प्रशिक्षण– महाराष्ट्र पोलीस



महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (MSACS) आणि महाराष्ट्र पोलीस दलाचे प्रशिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २००८–०९ या वर्षात 'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' (Training of Trainers T.O.T.) हा अभिनव कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. 'चेंज एजंट्स'– परिवर्तनाचे अग्रदूत– असे समर्पक नाव या कार्यक्रमाला देण्यात आले होते. पोलीस दलातील सदस्यांनी एचआयव्ही/एड्सपासून स्वत:चे संरक्षण करणे, त्याविषयीच्या प्रतिबंधक उपायांची माहिती करून घेणे आणि इतरांना याविषयी माहिती, आधार, मदत देणे व एचआयव्ही/एड्स संसर्गितांसाठी मोकळे व सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे होती. यातून अनेक 'चेंज एजंट्स' उपलब्ध व्हावेत ही अपेक्षा आहे.

**'चेंज एजंट्स'साठी प्रशिक्षण:** मुंबई, सांगली, औरंगाबाद, नागपूर व सिंधुदूर्ग या ठिकाणी ३४ जिल्ह्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यातील ५ ते ८ निवडक सदस्यांना एचआयव्ही/एड्स या विषयावर प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (T.O.T.) देण्यात आले. यातील प्रत्येक T.O.T. कार्यक्रम तीन दिवसांचा होता. पहिल्या दिवशी एचआयव्ही/एड्सबाबत शास्त्रीय व अचूक माहिती देणे, गैरसमज–शंकांचे निरसन करणे, या क्षेत्रात काम करणाऱ्या बिगर शासकीय संस्था, तज्ज्ञ प्रशिक्षक, त्यांचे काम व काम करण्याची आवश्यकता असलेली ठिकाणे याची माहिती देण्यात आली. इतरांना प्रशिक्षण देण्याबाबतच्या प्रक्रियेसंबंधी दुसऱ्या दिवशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तिसऱ्या दिवशी प्रशिक्षणार्थींनी इतरांना प्रशिक्षण देण्याविषयी प्रत्यक्ष कृतीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यासाठी तज्ज्ञांची देखरेख, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन होतेच.

भविष्यासाठी अशा प्रकारचा संयुक्त कार्यक्रम राबविणे चालू ठेवावे ही अपेक्षा महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या प्रशिक्षण संचालनालयाने व्यक्त केली. तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची शंभर टक्के अंमलबजावणी होण्यासाठी असा संयुक्त उपक्रम राबविणे उपयुक्त ठरणार आहे.

- सौ. हेमांगी पाटील
संनियंत्रण व मूल्यांकन अधिकारी (एफएचआय)

## डी.आय.सी.ॲडव्होकसी वर्कशॉप



नॅशनल एड्स कन्ट्रोल ऑर्गनायझेशन (NACO) च्या वतीने महाराष्ट्रात ड्रॉप इन सेंटर्स (DIC) ची स्थापना ऑगस्ट २००७ मध्ये करण्यात आली. एचआयव्ही संसर्गितांची काळजी घेणे आणि त्यांना आधार देणे हा त्यामधील उद्देश होता. या क्षेत्रातील अनुभवावरून लक्षात येते या कामाकरिता आवश्यक असणारे सामाजिक सहकार्य आणि योग्य वातावरण निर्मिती यासाठी 'पीएलएचए'चे मजबूत जाळे आणि त्यांचे सतत समर्थन अत्यंत आवश्यक आहे. ही बाब ध्यानात घेऊन महाराष्ट्राच्या ६ विभागांमध्ये ॲडव्होकसी वर्कशॉप (समर्थन कार्यशाळा) आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या त्या विभागातील सकारात्मक समर्थन देणाऱ्या व्यक्ती आणि ड्रॉप इन सेंटर्स (DIC) यांच्या संपूर्ण सहभागाने कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.

त्या त्या भागातील 'पीएलएचए'ना काम करताना येणाऱ्या समस्या जाणून घेणे व त्या सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना अधिकार प्रदान करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. समाजातील जबाबदार व्यक्ती व बिगर शासकिय संस्थांचे प्रतिनिधी यांचाही समावेश या कार्यशाळांमध्ये होता. हा कार्यक्रम राबविण्याबाबत विविध योजना आणि ध्येयधोरणे यांचा परिचय या कार्यशाळेत भाग घेणाऱ्या प्रतिनिधींना व्हावा आणि त्यांना किंवा त्यांच्या संस्थेला त्याचा लाभ घेणे शक्य व्हावे हा उद्देश त्यामागे होता. आयएमए, लायन्स क्लब, रोटरी क्लब यासारख्या संस्थांनी भाग घेऊन कार्यशाळा यशस्वी केल्या. सहभागी प्रतिनिधींनी केलेल्या विविध गुणदर्शनामुळे कार्यशाळा रंजक व यशस्वी झाल्या. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे अधिकारी डॉ. मेहता, डॉ. लक्ष्मी, श्री. शिंदे, श्री. गायकवाड यांनी या कार्यशाळांचे आयोजन करून त्या यशस्वी करण्यासाठी जी मेहनत घेतली त्याविषयी कौतुकोद्‌गार काढण्यात आले. सहभागी प्रतिनिधींनी आभारप्रदर्शन केले. कार्यशाळेच्या निमित्ताने जी संपर्कयंत्रणा (नेटवर्क) तयार झाली आहे ती सुव्यवस्थित ठेवण्याची शपथही घेण्यात आली या शपथेनेच कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

- सौ. लक्ष्मी पिळाई
उपसंचालक (आय.सी.टी.सी.)

## महाविद्यालयीन युवक – युवतींकरिता कार्यशाळेचे आयोजन



महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई व 'नोबल शिक्षण संस्था, वर्धा' यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धा जिल्ह्यातील महाविद्यालयीन युवक–युवतीकरिता एचआयव्ही/एड्स् जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले. या अंतर्गत महाविद्यालयांत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेकरिता प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक गंभीर (जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय वर्धा), डॉ. अशोक पानबुडे (जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था) डॉ. राज वाघमारे (जिल्हा एड्स समन्वय अधिकारी वर्धा), शिवा देवगडे (जिल्हा पर्यवेक्षक वर्धा), कु. शुभांगी रेवतकर (समुपदेशिका आय.सी.टी.सी.) संस्थेचे अध्यक्ष प्रविण हिवरे, प्रकल्प व्यवस्थापिका सौ. प्रतिभाताई शेंडे व संबंधित संस्थेचे प्राचार्य व अध्यक्ष इ. मान्यवर लाभले होते.

कार्यशाळेमध्ये गीतकार–संगीतकार रंजना ठाकूर यांच्या संचाने संगीतमय भाषेत एचआयव्ही/एड्स् म्हणजे काय, त्याची लक्षणे, खबरदारी, संसर्गित व्यक्तीने घ्यावयाची खबरदारी, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, एचआयव्ही रक्तपासणी कुठे होते, 'जाणून घ्या जागृत रहा'चा संदेश इ. संगीताच्या माध्यमातून सादर केले. समुपदेशिका कु. शुभांगी रेवतकर, सौ. प्रतिभाताई शेंडे, प्रविण हिवरे व वैद्यकीय अधिकारी यांनी एचआयव्ही/एड्सबाबत माहिती, रक्तपासणीच्या सुविधा, रक्तदानाचे महत्व, बाधा न होण्याबाबतची खबरदारी, व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा, संसर्गित व्यक्तीसाठी एआरटी औषधोपचार, गरोदर मातांनी घ्यायची खबरदारी व 'महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था, मुंबई' यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती युवक–युवतींना दिली. या कार्यक्रमाद्वारे ६ ते ७ हजार महाविद्यालयीन युवक–युवतींना मार्गदर्शन केले गेले. प्राचार्यांनी लेखी संमतीद्वारे महाविद्यालयामध्ये 'रेड रिबन क्लब'ची स्थापना करून एचआयव्ही/एडस्‌बाबत विविध कार्यक्रम व समाजप्रबोधनपर कार्य करण्याची हमी दिली.



**एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!**

# निर्धार

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा समाचार


## पंचायत राज विभागासाठी प्रशिक्षण कार्यक्रम



एन.ए.सी.पी. टप्पा ३ अंतर्गत HIV/AIDS SENSITIZATION हा कार्यक्रम केवळ महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे राज्यातल्या शासकीय विभागांमार्फत राबविण्याचे ठरविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनाच्या 'पंचायत राज' विभागासाठी प्रशिक्षण कार्यक्रम दि. २४ ते २७ फेब्रुवारी ०९ या कालावधीत यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. सदर प्रशिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यातील एक विस्तार अधिकारी (आरोग्य) व एक सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. त्या अनुषंगाने ट्रेनिंग मोड्यूल्स तयार करण्यात आली होती. अशा प्रकारे प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षकांनी त्यांच्या विभागात विविध प्रशिक्षणसत्रे राबवून एचआयव्ही/एड्सबाबत जनजागृती करण्याची योजना आहे. सदर प्रशिक्षणात प्रथमतः एचआयव्ही/ एड्सचे धोके कोणते आहेत, संसर्ग होण्याची कारणे काय आहेत तसेच ते टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच संसर्ग झाल्यानंतरही काय काळजी घेतली पाहिजे जेणेकरून एचआयव्ही/एड्सचा प्रसार न होता संसर्गित रुग्णाचे आयुष्य कशा रितीने वाढू शकेल याबाबतही प्रशिक्षण देण्यात आले. एचआयव्ही/एड्सबाबत समुपदेशन तसेच ICTC/ART सेंटर्सबाबत प्रशिक्षणार्थींना माहिती देण्यात आली.

प्रशिक्षण अत्यंत मौलीक स्वरूपाचे होते. समाजातील प्रमुख घटकांना प्रशिक्षित करून त्याद्वारे समाजातील इतर घटकांमध्ये एड्सबाबत जागृती घडवून आणण्यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे आयोजन करणे आता काळाची गरज बनली आहे.

- श्री. सुधीर गालिंदे
सल्लागार (मेनस्ट्रीमिंग)

## स्त्रीचे आरोग्य आणि एचआयव्ही/एड्स

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जागतिक महिलादिन नुकताच साजरा झाला. स्त्रियांशी संबंधित अनेक सामाजिक, कौटुंबिक मुद्दे दरवर्षी या दिवशी विशेषत्वे हाताळले जातात. त्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो, उपाययोजना आखल्या जातात. एचआयव्ही/एड्सचा संसर्ग हा स्त्रियांबाबतचा असाच एक अतिसंवेदनशील मुद्दा. युएनएड्स व इतर अनेक विश्वसनीय सेवाभावी संस्था यास्तव अविरत कार्य करीत असतात. त्यांच्या निरनिराळ्या सर्वेक्षण व अहवालांतून समोर आलेल्या निरीक्षणांचा काही भाग खास '**निर्धार**'च्या वाचकांसाठी येथे देत आहोत...

२००७ साल संपताना जगभरातील एचआयव्ही/एड्स संसर्गित रुग्णांची संख्या सुमारे तीन कोटी आठ लाख एवढी होती. त्यांमध्ये स्त्रियांचं प्रमाण जवळपास निम्मं होतं आणि त्यातल्या ९८% स्त्रिया विकसनशील देशातील होत्या. जगभर फैलावलेल्या एचआयव्ही/एड्सच्या समस्येतून स्त्रिया सुटू शकलेल्या नाहीत. उलट पुरुषांपेक्षा दुप्पट वेगानं त्या या व्याधीला बळी पडत आहेत. याची मुख्य कारणं म्हणजे त्यांचं दुय्यम सामाजिक स्थान व एचआयव्हीचा संसर्ग चटकन होऊ शकेल अशी त्यांची अरक्षित शारीरिक अवस्था.

असुरक्षित लैंगिक संबंधांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांना एचआयव्हीचा संसर्ग होण्याची शक्यता दुप्पट आहे. कारण लैंगिक संबंधांच्या वेळी सुरक्षित साधनांचा वापर करण्यास त्या असमर्थ असतात. अनेक देशांमध्ये स्त्रीला आजही बळजबरीच्या लैंगिक संबंधांना अचानकपणे सामोरं जावं लागतं. त्यामुळे अर्थातच कंडोमसारख्या साधनांचा वापर करून लैंगिक संबंध निदान स्वतःपुरते तरी सुरक्षित राखणं तिला शक्य होत नाही. शिवाय आजही 'आपण कोणाशी विवाह करावा' किंवा 'आपल्या लैंगिक जोडीदारांची संख्या किती असावी' हे निर्णय आजही पुरुषाच्याच हाती आहेत. त्यामुळे कित्येक एकनिष्ठ स्त्रियांना केवळ जोडीदाराने विश्वासघात केल्यामुळे एचआयव्हीचा संसर्ग झालेला दिसतो.

स्त्रियांमध्ये एड्सचं प्रमाण कमी करण्यासाठी अनेक गोष्टी साध्य कराव्या लागतील. प्रथमतः स्त्रियांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून द्यायला हवी. त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा आणि त्यांच्यात या व्याधीबद्दल अधिकाधिक जागरुकता निर्माण व्हायला हवी. याशिवाय, संसर्ग होऊ नये म्हणून नवनवीन तंत्रांची माहितीही त्यांना उपलब्ध व्हायला हवी.

### स्त्रियांना एचआयव्हीचा संसर्ग टाळण्याचे उपायः

**फीमेल कंडोम** (स्त्रियांनी वापरावयाचे कंडोम) हा लैंगिक संबंध सुरक्षित ठेवण्याचा एकमेव उपाय स्त्रियांबाबत आज अस्तित्त्वात आहे. या कंडोमचा नियमित व सातत्यपूर्ण वापर त्यांना एचआयव्ही/ एड्सपासून अधिक सुरक्षित ठेऊ शकतो. असं असलं तरी लैंगिक संबंधांच्या वेळी पुरुषांनी देखील कंडोम वापरणं हे अधिक श्रेयस्कर. कारण स्त्रीला एचआयव्हीचा संसर्ग न होऊ देणं ही एकट्या स्त्रीचीच जबाबदारी नव्हे. त्यासाठी पुरुषाचं सहकार्य देखील त्याच प्रमाणात अपेक्षित आहे.

कित्येक देशांमध्ये बलात्कारित स्त्रिया वा लैंगिक हिंसा भोगाव्या लागणाऱ्या स्त्रियांना प्रोफिलॅक्सिससारखी उपचारपद्धती सहज उपलब्ध होत नाही. त्यामुळे विशिष्ट **मायक्रोबायसिड्** निर्माण करण्याबाबत संशोधन चालू आहे. योनीमार्गाच्या आत लावता येण्याजोगे हे जेल किंवा क्रीम स्त्रियांना एचआयव्हीचा संसर्ग होण्यापासून वाचवू शकेल.

एचआयव्ही/एड्सबाबत दिले जाणारे **शालेय शिक्षण** हे मुलींना व्याधीचा संसर्ग होण्यापासून वाचविण्यात विशेष उपयुक्त ठरणारे आहे. एड्सबाबतच्या गैरसमजुती, जोखीमपूर्ण वर्तणूक, भावनिक समतोल या गोष्टी शाळेत परिणामकारकपणे शिकविल्या जाऊ शकतात. 'शिक्षण व स्त्रियांमधील एड्सचे प्रमाण' याविषयी युएनएड्स या जागतिक सेवाभावी संस्थेद्वारे दक्षिण आफ्रिकेत सर्वेक्षण केले गेले. त्यातील अहवालांमध्ये शिक्षणामुळे शालेय विद्यार्थिनींमधील एचआयव्ही एड्सचा संसर्ग होण्याचे प्रमाण दरवर्षी ७%ने कमी झालेले दिसून आले!

एड्सशी मुकाबला करायचा असेल तर त्याबाबतचा सामाजिक आकस कमी होणे आवश्यक आहे. तसे झाले तर ज्या व्यक्तिंना या व्याधीचा सर्वाधिक धोका आहे त्यांना संरक्षण देणे तर सोपे होईलच परंतु याबाबतचे सामाजिक चित्रही अधिक स्पष्ट होईल. म्हणूनच 'एचआयव्ही/एड्सबाबत जागृती हाच त्यापासून संरक्षण मिळवण्याचा सर्वात मोठा व सर्वाधिक योग्य मार्ग आहे,' असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल.



एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!

# निर्धार

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचा समाचार




डीआयसी ॲडव्होकसी वर्कशॉप




आंगणेवाडी यात्रोत्सवातील एड्सवरील जनजागृती स्टॉल




ट्रकर्स मेळाव्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. संदिप भाजीभाकरे सर अध्यक्षीय भाषण देतांना



एड्स् संदेश रॅलीला उपस्थित अधिकारी व कर्मचारी



लांजा, रत्नागिरी येथील एसटी स्टॅंडवर पथनाट्याचे सादरीकरण




सोलापूर येथील वर्दळीच्या रस्त्यावरील एका भिंतीवर रंगविलेला संदेश

निवेदनः 'महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे'द्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृतीपर योजनांची माहिती संस्थेच्या 'निर्धार' या मुखपत्राद्वारे नियमित प्रसिद् ध होत आहे. त्याबाबत आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे मनापासून स्वागत करीत आहोत. आपल्या प्रतिक्रिया, सूचना तसेच एचआयव्ही/एड्ससंबंधी लेख इत्यादि साहित्य कृपया खालील पत्त्यावर पाठवावे...



महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन,
ॲक्वर्थ संकूल, आर. ए. किडवाई मार्ग, वडाळा (प.), मुंबई - ३७. दूरध्वनीः ०२२-२४११३०९७
माहिती, शिक्षण व संवाद विभाग, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडून जनहितार्थ प्रकाशित

Printed & Designed by Mother's Graphics (I) Pvt. Ltd. 9820251690